## सांजवेळ

बघ सांजवेळ झाली सखया
क्षणभर विसावू या वळणावर
दिशाही पहा अंधारून आल्या
आठवणींच्या सागरी किनाऱ्यावर

नाही मिळाला मज कधी विसावा
ना कामातून मिळाली तुज उसंत
अंतरीचे गुज राहिले मनात
सलते आता हृदयात, ही एकच खंत

स्मरती क्षण सुखदुःखाचे सारे
शोधती आता मज उद्याची न वाटे
काळजात उगा काळोख घेरे
गतस्मृतींचे काहूर हृदयी दाटे

कणाकणाने, आयुष्य सरले
आठवणींचे मोती, विखरून गेले
मनातले शब्द, ओठावर येता-येता
सागरी लाटांसम परतून गेले

बोलायचे काही राहून गेले
वाटतो जगी आता हा दुरावा
क्षणभर सखया घेऊ या विसावा
अंत्यसमयी हातात हात तुझा असावा
अंत्यसमयी हातात हात तुझा असावा

सौ. ऐश्वर्या डगांवकर इंदूर